औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या शुक्रवार दिनांक २८. ६.९१ रोजी झालेल्या ६३ व्या सभेचा कार्यवृत्तांत.

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] श्री. ईश्वरराव भोसीकर | सभापती, औरंगाबाद मंडळ, |
| २] श्री. अरविंद महाजन | उपसभापती, औरंगाबाद मंडळ, |
| ३] श्री. मुन दे. हि.<br>उपसंचालक,<br>नगररचना व मुल्यनिर्धारण<br>विभाग औरंगाबाद. | सदस्य |
| ४] श्री. व. शा. राजभोज<br>कार्यकारी अभियंता,<br>आयुक्त म. न. पा. औरंगाबाद<br>यांचे प्रतिनिधी | सदस्य प्रतिनिधी |

विषय क्र. १: दिनांक २९. ५. ९१ रोजी झालेल्या ६२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

मंडळाच्या ६२ व्या सभेतील विषय क्र. २ व ठराव क्र. ३७१ वर चर्चा करतांना मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी असे विचारले की, मंडळाला स. क्र. १०४/१ तीसगांव यामधील मिळालेल्या शासकीय जमिनीच्या संयुक्त मोजणी नकाशाच्या तफावतीबाबत काय कार्यवाही केली. यावर उपसभापतींनी सांगितले की, जिल्हाधिकारी औरंगाबाद हे लोकसभेच्या निवडणूकीच्या कामकाजात असल्याने त्यांच्याशी संपर्क साधता आला नाही.

याप्रकरणी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांची त्वरीत भेट घेऊन संयुक्त मोजणी नकाशाच्या तफावतीबाबत त्यांना कल्पना द्यावी.

तसेच विषय क्र.४ व ठराव क्र.३७४ वर चर्चा करतांना उपसभापतींनी सांगितले की, लातूर येथील मंडळाचे उर्वरीत गाळे वितरीत करण्यासंबंधी जाहिरात देऊन यापूर्वी ज्याप्रमाणे महाराष्ट्र बँकेकडे अर्ज विक्री व स्विकृती ठेवली होती. त्याप्रमाणे न.प. लातूर यांच्या कार्यालयात अर्ज विक्री व स्विकृतीसाठी मंडळाचा प्रतिनिधी न.प. लातूर येथे ठेवावा.

यासंबंधी उपसभापती यांनी मंडळाच्या कार्यालयात न.प. लातूर यांचे पदाधिकारी आले असता त्यांच्याशी चर्चा केलेली आहे व त्यांनी उर्वरीत गाळे वितरीत करण्याच्या दृष्टीने सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे.

ठराव क्र. ३७५

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने २९.५.९१ रोजी झालेल्या ६२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र.२: अमृतधाम नाशिक येथील विडी कामगारांकरिता बांधलेल्या ४४७ गाळ्यांच्या वाटपाबाबत.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापतींनी मंडळास माहिती दिली की, मंडळाने स.न. २६७/२ अमृतधाम नाशिक येथे विडी कामगारांकरिता ४४७, अल्प उत्पन्न गट १०० गाळे व १०८ गाळे अशी योजना राबविली आहे. ४४७ गाळे विडी कामगारांसाठी बांधून पूर्ण झाले आहे. परंतु पाणीपुरवठा व पोहचमार्ग नसल्याने गाळे वाटपास विलंब होत आहे. उपसभापतींनी सांगितले की, ऑगष्टमध्ये नाशिक येथे होणा-या "सिंहस्थ" मेळाव्यासाठी बाहेरगांवाहून येणारे यात्रेकरू मंडळाचे गाळे व्यापण्याची तीव्र संभावना आहे. महानगरपालिकेकडे पाणीपुरवठ्याचे कामापोटी मंडळाने विहीत रक्कम भरली आहे. सदर काम लवकर पुर्ण करणेसाठी महानगरपालिकेकडे पाठपुरावा करणेंत आला. परंतु सिंहस्थाचे पुर्व तयारीची कामे असल्याने सदरचे काम लवकर होणार नाही असे आढळुन आले. म्हणून मंडळाच्या वसाहतीत तीन

बोअरवेल द्यावे.

सदर योजनेस लागुन पाटबंधारे कालवा आहे. पाटबंधारे खात्यातर्फे बांधलेल्या कालव्याच्यां शेजारी असणा-या रस्त्याचा उपयोग सध्या पोहच मार्ग म्हणून करण्यांत येतो. मंडळाने पाटबंधारे खात्यास विनंती करून सदर रस्त्याचा वापर करण्याची परवानगी डी.पी. रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यन्त घेण्यांत यावी म्हणजे गाळे वाटपास अडचण निर्माण होणार नाही.

सदर रस्त्याचा वापर केवळ मंडळाच्या वसाहतीमध्ये जाण्यासाठी होणार असल्याने रोडवर मंडळाने विजेचे दिवे बसविणे संयुक्तीक व आवश्यक आहे. त्यासाठी मंडळाने आवश्यक तेवढा खर्च करावा व मंडळासमोर नंतर माहिती सादर करावी.

ठराव क्र. २७६

---

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, सदर योजनेतील गाळे वाटप त्वरीत होण्यासाठी अमृतधाम नाशिक येथील विडी कामगार व अल्प उत्पन्न गट योजनेतील वसाहतीत पाणी-पुरवठ्यासाठी तीन बोअरवेल द्याव्यात व पोहच मार्गासाठी मंडळाच्या वसाहती शेजारी असलेल्या कालव्याच्या काठाने पाटबंधारे खात्यातर्फे तयार करण्यांत आलेल्या रस्त्याचा पाटबंधारे खात्याकडून परवानगी घेऊन डी.पी. रोड होईपर्यन्त वापर करणेची मंजूरी द्यावी. त्या रोडचा केवळ मंडळाच्या वसाहतीमध्ये जाण्यासाठी उपयोग होणार असल्याने रोडवर मंडळातर्फे दिवे बसविण्यांत यावे व त्याचा खर्च मंडळाने करावा.

विषय क्र. ३:- मालेगांव नगरपालिकेकडून आलेल्या आयेशानगर या या झोपडपट्टीतील सुधारणा कामाच्या प्रस्तावास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाबत.

या विषयावर चर्चा करतांना उपसभापती यांनी मंडळास माहिती दिली की, मालेगांव नगरपालिकेकडून आयेशानगर झोपडपट्टी सुधारणा कामाचा सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

. . . .

नासिक जिल्हयासाठी १९९१-९२ या आर्थिक वर्षात झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रमाकरिता ९.६४ लक्ष रूपयाची तरतूद असून त्यापैकी मालेगांव शहरासाठी १.५० लक्ष रूपये प्रस्तावीत आहे. आतापर्यंत नगरपालिका, मालेगांवच्या याकार्यक्रमावरील खर्च निरंक आहे. त्यामुळे संपूर्ण तरतूद शिल्लक आहे. सध्या मालेगांव नगरपालिकेच्या हाती ३.१८ लक्ष रूपयांची कामे आहेत ही कामे गणेशनगर या झोपडपट्टीतील शौचालयाच्या बांधकामासाठी असून जागे अभावी सदर काम बंद आहे ही रक्कम खर्ची पडणे अशक्य आहे. त्यामुळे या वर्षाची तरतूद खर्च होण्याच्या दृष्टीने वरील प्रस्तावाला सुधारीत प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे.

ठराव क्र.:- ३७७:

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, मालेगांव नगरपालिकेकडून आलेल्या आयेशानगर झोपडपट्टी सुधारणा कामाच्या सुधारीत प्रस्तावाला रु. ४,२५,९१६/- प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

विषय क्र. ४:- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या अंतर्गत करण्यांत आलेल्या नियमावलीनुसार गाळयांच्या वाटपाचे आरक्षण ठेवतांना, आरक्षणाचे टक्केवारीनुसार पुर्णांकात न निघता अपूर्णांकात निघत असल्यास करावयाची कार्यवाही.

ठराव क्र. ३७८.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, आरक्षणाचा टक्केवारी प्रमाणे गाळे आरक्षित करावेत परंतू एखाद्या गटाला मागणी असल्यास अपूर्णांका ऐवजी पूर्ण गाळा देऊन एकूण आरक्षणाचे संतुलन राखले जावे. ही बाब मुख्य अधिकारी यांनी कटाक्षाने पाहावी.

विषय क्र. ५:- जालना येथील २७ मध्यम उत्पन्न गट गाळे, स.नं. १२१ भोकरदन रोड याचे राखण व संरक्षण यासाठी ठेकेदाराने केलेल्या खर्चाला मंजूरी देणे बाबत.

या विषयावर चर्चा करतांना कार्यकारी अभियंता, औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास माहिती दिली की, मंडळाने जालना स.नं. १२१ [भाग ]

भोकरदन रोड येथील मध्यम उत्पन्न गटातील २७ गाळ्यांची योजना राबवली आहे. सदर योजनेचे बांधकाम मार्च ८९ मध्ये पूर्ण झाले आहे. सदर योजनेस बाह्य पाणीपुरवठा, १ मे ८८ पर्यंत करणे संभाव्य होईल असे नगरपालिका, जालना यांनी त्यांचे पत्र क्र.. ५५३९ दिनांक २१.७.८९ अन्वये दिले होते. नगरपरिषदेने आजपर्यंत पाणीपुरवठा न केल्यामुळे गाळ्याचे वाटप होऊ शकले नाही.

आता मंडळातर्फे पाणी पुरवठ्यासाठी एक कुपनलिका घेण्यांत येऊन सबमर्सिबल पंपसेट बसविला आहे व सदर गाळ्याचे वाटप दि. १.४.९१ पासून सुरु करण्यांत आलेले आहे. पाणी पुरवठ्या अभावी गाळे पूर्ण होऊनही वाटप न करता आल्यामुळे इमारतीचे राखण व संरक्षण कंत्राटदाराने केलेले असल्यामुळे दि. २५.४.९१ च्या पत्रान्वये ठेकेदाराने चौकीदारी- - करिता केलेल्या रकमेची अदायगी करण्याची विनंती केलेली आहे.

ठराव क्र. ३७९:

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, जालना येथील २७ मध्यम उत्पन्न गट गाळ्याचे बांधकाम ठेकेदाराने गाळे वाटप न झालेल्या कालावधीत गाळ्याचे राखण व संरक्षण चौकीदार नेमून केले आहे. त्यासाठी केलेला खर्च नियमाप्रमाणे रु. ९,६००/- देय होतो. कार्यकारी अभियंता, औरंगाबाद यांनी ठेकेदाराने दिलेला प्रस्ताव तपासून व खात्री करुनच देयक ठेकेदारास द्यावयाचे आहे. या काळात इमारतीचे झालेले नुकसान भरपाईची जबाबदारी ठेकेदारावर टाकलेली आहे. गाळेधारकाला गाळा ताब्यात देते वेळी सर्व बाबी पूर्ण करुन द्यावयाच्या आहे.

सभेनंतर मा. सभापतीचे आभार मानून सभा संपली.